पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३९९ दिनांक - २९/०५/२०२३**

## भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## दारुच्या दुकानावर दरोडा टाकणा-या आरोपींना दोन तासात अटक

दिनांक २४/०५/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे दारुच्या दुकाना मध्ये काम करीत असताना,इसम नामे अजय पांचाळ, तेजस वाडेकर, सोहेल आसंगी, गोविंद लोखंडे, सोन्या कांबळे, अमोल ढावरे यांनी फिर्यादी यांचे दुकाना मध्ये येवुन फिर्यादी व मॅनेजर यांना शिवीगाळ करुन अजय पांचाळ याने फिर्यादी यांचे दुकान मालकांना फोन करुन "मी अजय पांचाळ असुन,मी आताच जेल मधुन बाहेर सुटुन आलोय,तुला कळत नाही का हप्ता चालु करायला,हप्ता चालु केला नाही तर,तुला सोडणार नाही" अशी धमकी दिली.

त्यानंतर फिर्यादी यांचे दुकानातील दारुच्या बाटल्या,थंड पेयाच्या बाटल्या,काचेचे ग्लास,दगड फेकुन दुकानातील दारुच्या बाटल्या,टी.व्ही.चे नुकसान करून,अजय पांचाळ याने दुकानातील काऊंन्टर मधील असलेले १० हजार रूपये जबरदस्तीने घेवुन,दुकानाचे बाहेर येवुन,दगडी फेकुन आरडा-ओरड केली म्हणुन **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.३२६/२०२३,भादंवि कलम ३८५,३९२,५०४,५०६,४२७,क्रिमीनल अमेंन्टमेंन्ट ॲक्ट कलम ७** अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असताना, **पोलीस अंमलदार,अभिजीत जाधव, राहुल तांबे, विक्रम सावंत** यांचे गोपनीय बातमीदारांचे मार्फतीने आरोपी **१.सोहेल मोदीन आसंगी,वय २२ वर्षे,रा. इंद्रायणी नगर,आंबेगाव,पुणे २.अमोल तानाजी ढावरे,वय १९ वर्षे,रा.विश्व हाईटस,जांभुळवाडी रोड,आंबेगाव,पुणे ३.आदित्य ऊर्फ सोन्या खंडु कांबळे,वय २० वर्षे,रा.हनुमाननगर,जांभुळवाडी रोड,आंबेगाव,पुणे** यांचा शोध घेतला असता ते मिळुन आल्याने त्यांना अटक करण्यात आले आहे.**तसेच सदर गुन्हयातील दोन विधीसघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.**

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशि विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील,मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग, पुणे, श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विजय कुंभार, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, सचिन धामणे, पोलीस उप-निरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार,अभिजीत जाधव, राहुल तांबे, विक्रम सावंत, शैलेश साठे, चेतन गोरे, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधुत जमदाडे, सचिन सरपाले, सचिन गाडे, धनाजी धोत्रे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, नितीन जाधव यांच्या पथकाने केली आहे.